Lyceum India Journal of Social Sciences || ISSN (Online): 3048-6513
Volume: 3 Issue: 3 || February 2026 (Special Issue 1) || DOI: 10.5281/zenodo.18844020

# १९ व्या शतकातील महाराष्ट्रातील शैक्षणिक परिस्थितीचा आढावा

**प्रवीण लक्ष्मणराव कदम** [1]

**प्रस्तावना -**

इ.स.१५ - १६ व्या शतकात युरोपमध्ये प्रबोधन युगाला सुरुवात झाली. याचाच परिणाम म्हणजे हे युरोपातील लोक इतरत्र देशांमध्ये जावु लागले. यातच भारताकडे येणाऱ्या जलमार्गाचा शोध लागल्यामुळे युरोपीयनांचे लक्ष भारताकडे केंद्रित झाले इ.स. १४९८ ला पोर्तुगीज खलाशी वास्को-द-गामा हा भारतात आला आणि पुढे गोवा हे पोर्तुगीजांचे मुख्य ठाणे बनले. इ.स. १६०० मध्ये ब्रिटिशांनी पूर्वेकडील देशाशी व्यापार करण्याचा हेतूने भारतात ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना केली आणि यामार्फत याठिकाणी व्यापार सुरू केला. या व्यापारातून भरमसाठ नफा मिळवून त्यांनी हळूहळू संपूर्ण भारतावर आपले वर्चस्व निर्माण केले आणि एकहाती सत्ता निर्माण केली.

इ.स.१८१८ मध्ये पेशवाईचा अस्त झाला आणि महाराष्ट्रात ब्रिटिश राजवट सुरू झाली. येथून पुढे १९ वे शतक हे महाराष्ट्राच्या गुलामगिरीचे शतक ठरले मराठी सत्तेच्या ऱ्हासा नंतर महाराष्ट्रात इंग्रजी सत्तेचा अंमल सुरू झाला. भारतामध्ये व महाराष्ट्रात इंग्रजी सत्तेच्या अंमलामुळे दुरगामी असे परिणाम घडून आले महाराष्ट्राचे राजकीय सामाजिक व आर्थिक क्षेत्र इंग्रजी सत्तेच्या अंमलामुळे ढवळून निघाले. ब्रिटिश सत्तेमुळे मराठी माणसाचा पाश्चिमात्य विद्या, कला व शास्त्र यांच्याशी संबंध आला आणि जुन्या चालीरीती, अंधश्रद्धा आणि जातिव्यवस्था या गोष्टीवर आघात होण्यास सुरुवात झाली. इंग्रजी शिक्षणामुळे समाजाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला सुरुवातीला इंग्रजी सत्ता भारतात आल्यावर त्यांनी धार्मिक व सामाजिक दृष्टीमध्ये हस्तक्षेप न करण्याचे धोरण स्वीकारले थोडक्यात महाराष्ट्रातील समाजाची वैचारिक कोंडी फोडण्याचे कार्य १९ व्या शतकाने केल्यामुळे हे शतक महाराष्ट्राच्या सर्वांगीण जीवनात महत्त्वपूर्ण ठरते.

**संशोधनाची उद्दिष्टे -**

- १९ व्या शतकातील महाराष्ट्रातील शैक्षणिक परिवर्तनाचा आढावा घेणे.
- १९ व्या शतकातील महाराष्ट्रातील ब्रिटिश कालीन शिक्षण पद्धती अभ्यासणे.
- १९ व्या शतकातील महाराष्ट्रातील स्त्री शिक्षणाचा आढावा घेणे.
- १९ व्या शतकातील महाराष्ट्रातील शिक्षणाचा समाजावरील परिणाम अभ्यासणे.
- १९ व्या शतकातील शिक्षण पद्धतीवर पाश्चिमात्य शैक्षणिक विचारांचा झालेला प्रभाव अभ्यासणे.

**गृहितके -**

- गतकाळातील शिक्षण क्षेत्रात शिक्षण सुधारकांच्या कार्यामुळे परिवर्तन झाले.
- सद्यस्थितीत १९ व्या शतकातील शिक्षण सुधारकांच्या विचारांची व योगदानाची आवश्यकता आहे.

[1] संशोधक विद्यार्थी , डी एस एम कॉलेज परभणी

- प्रचलित शिक्षण पद्धतीत विविध दोष दूर करण्यासाठी १९ व्या शतकातील शिक्षण सुधारकांचे विचार प्रभावी आणि उपयुक्त आहेत.

**१९ व्या शतकातील महाराष्ट्रातील शैक्षणिक परिस्थिती -**

ब्रिटिशपूर्व काळात शिक्षण हे मुख्यतः धार्मिक व पारंपारिक स्वरूपाचे होते यामध्ये शिक्षणात लष्करी, व्यवहारीक, आणि धार्मिक शिक्षण होते. त्यावेळी क्रमिक पुस्तके नव्हती. शाळांचे व शिक्षणाचे स्वरूपात अत्यंत कमी दर्जाचे होते. १८१८ नंतर महाराष्ट्रात ब्रिटिश राजवटीमुळे शैक्षणिक विकास होत गेला. खऱ्या अर्थाने १९ वे शतक हे महाराष्ट्राच्या इतिहासातील नव्या युगाची सुरुवात होय. कारण भारतात आधुनिक शिक्षण व भौतिक विद्यांचा अभ्यास येथूनच सुरू झाला. या शिक्षणामुळेच महाराष्ट्र तसेच भारतातील समाजाच्या जीवनात एक परिवर्तन घडून आले.

**ब्रिटिशपूर्वकालीन शिक्षण पद्धती -**

ब्रिटिशपूर्व काळात भारतात वेद, धर्मशास्त्र, तर्कशास्त्र, व्याकरण या विषयाला मुख्यतः प्राधान्य होते. शिक्षण समाजातील सर्व वर्गांना उपलब्ध नव्हते. महाराष्ट्रातही शिक्षणाची हीच अवस्था होती. येथील वेगवेगळ्या राजवटीने आपल्या साम्राज्यविस्ताराच्या धोरणामुळे शिक्षणाकडे लक्ष दिलेले दिसत नाही. कनिष्ठ वर्गातील जातींना शिक्षणाचा अधिकार नव्हता. व्यवहार करण्यासाठी आवश्यक असेल तेवढेच पारंपारिक शिक्षण दिल्या जाई. परंतु पुढील काळात जी काही शिक्षण व्यवस्था प्रचलित केली त्याचे श्रेय इंग्रजांनाच द्यावे लागते.

**ब्रिटिशांचे शिक्षण विषयक धोरण -**

भारतात ख्रिश्चन मिशनऱ्यांनी मानवतेच्या भूमिकेतून शिक्षण देण्यास सुरुवात केली अर्थात त्यांचा यामागील मुख्य हेतू म्हणजे धर्माचा प्रसार करणे हाच होता. नंतर इंग्रजांना प्रशासनात काम करण्यासाठी कारकुणाची गरज भासू लागली आणि हे कारकुण त्यांना येथे शिक्षण दिले तरच मिळणे शक्य होते. काही इंग्रज अधिकाऱ्यांना मात्र भारतीय लोकांना वेगवेगळ्या विषयांचे शिक्षण द्यावे अशी इच्छा होती. यामुळेच ईस्ट इंडिया कंपनीने सन १८१३ च्या सनदी कायद्यानुसार भारतीयांच्या शिक्षणासाठी दरवर्षी एक लाख रुपये खर्च करावेत असे बंधन घातले होते.

**बॉम्बे एज्युकेशन सोसायटीची स्थापना -**

ख्रिश्चन मिशनऱ्यांनी धर्माच्या प्रसारासाठी शाळा उघडल्या व त्याद्वारे शिक्षण देण्यास सुरुवात केली मात्र मुंबई या ठिकाणी कंपनीच्या वतीने बॉम्बे एज्युकेशन सोसायटीची स्थापना करण्यात आली व त्याद्वारे निरनिराळ्या शाळांची, कॉलेजची स्थापना करून शिक्षण देण्यास सुरुवात केली. गरीब लोकांना शिक्षण देणे हा या संस्थेचा प्रमुख उद्देश होता. या माउंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन हा या संस्थेचा प्रमुख होता. १८२४ मध्ये एल्फिन्स्टन हायस्कूल ची स्थापना झाली त्याचेच पुढे एलफिन्स्टन महाविद्यालयात रूपांतर झाले. तसेच याबरोबरच या संस्थेने मुंबईच्या बाहेर देखील शाळा सुरू केल्या. स्थापत्य व वैद्यकशास्त्र या विषयांचे शिक्षण देण्यास सुरुवात केली. पुढे एल्फिन्स्टनच्या प्रेरणेने द नेटिव्ह स्कूल अँड स्कूल बुक कमिटीची स्थापना करण्यात आली. या मार्फत अनेक शाळा सुरू करण्यात आल्या. त्यानंतर १८२३ मध्ये लोक शिक्षण समिती स्थापना करून शिक्षण विषयक माहितीचे

संकलन या समितीने करावे असे ठरले. १८१३ च्या सनदी कायद्यानुसार मान्य केलेले एक लाख रुपये या समितीकडे सोपवण्यात आले.

**संस्कृत महाविद्यालयाची स्थापना -**

पेशवाईचा अंत झाल्यानंतर वरिष्ठ वर्ग नाराज होऊ नये म्हणून एलफिस्टनने १८२१ मध्ये दोन लाख खर्च करून पुणे येथे संस्कृत महाविद्यालयाची स्थापना केली. या ठिकाणी वेद, वेदांगे, व्याकरण हे विषय शिकवले जात असत. यातील शिक्षणाचे माध्यम हे मराठी ठेवण्यात आले परंतु विद्यार्थ्यांकडून याला प्रतिसाद न मिळाल्यामुळे १८५१ मध्ये संस्कृत ऐवजी या ठिकाणी इंग्रजीतून अध्ययनास सुरुवात केली आणि याचे नाव पुना कॉलेज असे ठेवले. याच महाविद्यालयाची पुढे १८६१ मध्ये दोन महाविद्यालयात विभागणी करण्यात आली. ती म्हणजे एक इंग्रजी शिक्षण देणारे डेक्कन कॉलेज आणि दुसरं म्हणजे मराठीतून उच्च शिक्षण देणारे व्हर्णाक्युलर कॉलेज हि होय.

**बोर्ड ऑफ एज्युकेशन -**

महाराष्ट्रातील शिक्षणात सुसत्रता आणण्यासाठी सन १८४० मध्ये मुंबई या ठिकाणी बोर्ड ऑफ एज्युकेशनची या समितीची स्थापना करण्यात आली. या समीतीमध्ये सरकारने नियुक्ती केलेले तीन प्रतिनिधी व तीन बॉम्बे एज्युकेशन सोसायटीचे प्रतिनिधी यांचा समावेश होता. या समितीने शाळा स्थापन करणे व शाळांना मान्यता देण्याचे नियम तयार केले. पुढे पंधरा वर्षे या समितीने शैक्षणिक कार्यामध्ये महाराष्ट्रात शैक्षणिक प्रगती घडून आणली.

**१८३५ चा लॉर्ड मेकॉलेचा अहवाल -**

भारतातील शिक्षण पद्धतीवर नियंत्रण ठेवण्यासाठी कंपनीने १८३३ मध्ये कमिटी ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन या समितीची स्थापना केली आणि या समितीच्या अध्यक्षपदी लॉर्ड मेकॉले याची नियुक्ती केली. पुढे लार्ॅड मेकॉले याने भारतातील शिक्षण पद्धतीचा अभ्यास करून येथील शिक्षण पद्धतीत काय सुधारणा करता येतील याचा अहवाल २ फेब्रुवारी १८३५ रोजी कंपनी सरकार पुढे ठेवला. यालाच १८३५ चा लॉर्ड मेकाले अहवाल असे म्हणतात.

**मेकॉलेच्या शिक्षणविषयक शिफारशी-**

- विज्ञान आणि इंग्रजी साहित्याला सर्वोच्च स्थान देण्यात यावे.
- शिक्षणाचे माध्यम हे मराठी असावे.
- संपूर्ण जनतेला शिक्षीत करण्याऐवजी फक्त उच्च वर्गालाच शिक्षण द्यावे.
- संस्कृत शाळांचे अनुदान बंद करावे.
- ब्रिटिश शासन आणि जनता यामध्ये मध्यस्थाची भुमिका पार पाडण्यासाठी एक शिक्षीत वर्ग तयार करावा.

हा अहवाल १८३५ च्या इंग्रजी शिक्षण कायद्याचा पाया बनला ज्यामुळे भारतात पाश्चात्य शिक्षण पद्धतीला सुरुवात झाली.

**१८५४ चा वुडचा खलिता -**

भारतात कंपनीच्या प्रयत्नामुळे शिक्षणाला गती मिळाली. लॉर्ड मेकॉले च्या प्रयत्नामुळे इंग्रजी शिक्षणाचे महत्त्व येथे वाढत गेल. त्यामुळे शिक्षणासाठी अजून काय करता येईल यासाठी कंपनी सरकारने सर चार्ल्स वुड याच्या अध्यक्षतेखाली एक कमिटी नेमली व या कमिटीला शिक्षणासाठी काय करता येईल याची माहिती देण्यास सांगितले. त्यानुसार चार्ल्स वुडणे भारतातील शिक्षणाचा अभ्यास करून प्रगत शिक्षण करण्यासाठी सन १९ जुलै १८५४ रोजी काही सूचना केल्या त्यालाच १८५४ चा वुडचा खलीता असे म्हणतात. त्यालाच भारतातील इंग्रजी शिक्षणाचा मॅग्नाकार्टा असे देखील म्हणतात.

**१८५४ च्या वुडच्या शिफारशी -**

- भारतात प्राथमिक शिक्षणापासून विद्यापीठापर्यंत शिक्षण प्रणाली सुरू करावी.
- खाजगी शाळांना अनुदान देणे.
- शासनाने आपल्या अग्रक्रमाच्या कर्तव्यात शिक्षणाचा समावेश करावा.
- भारतातील शिक्षण हे धर्मातीत असावे.
- शिक्षणाचे माध्यम म्हणून देशी भाषांना प्रोत्साहन द्यावे.
- कनिष्ठ पातळीपासून ते उच्च पातळीपर्यंतच्या शिक्षणात सुसंवाद असावा.
- प्रांतात प्राथमिक, माध्यमिक शाळा सुरू कराव्या व तेथे देशी भाषेतून शिक्षण द्यावे.

अशाप्रकारे या वुडनी मांडलेल्या धोरणांचा भारतात लगेच स्वीकार करण्यात आला त्याला पुढे लॉर्ड डलहौशीच्या काळात चालना मिळाली.

**हंटर आयोग ---**

वुडच्या शिफारशीचा स्वीकार केल्यानंतर पुढील काळात शिक्षण क्षेत्रात आणखी प्रगती व्हावी यासाठी लॉर्ड रिपनने १८८२ मध्ये सर विल्यम हंटर याच्या अध्यक्षतेखाली एक कमिटी नेमली. आणि या कमिटीला शिक्षणासाठी काय करता येईल त्या सूचना करण्याचे सुचविले. त्यानुसार या आयोगाने अनेक शिक्षण संस्थांना भेटी दिल्या त्यांच्या शैक्षणिक कार्याची पाहणी केली आणि शासनाला शिफारशी सादर केल्या. त्या प्रमुख शिफारशी पुढीलप्रमाणे होत्या.

- खाजगी शिक्षण संस्थांना उत्तेजन द्यावे व त्यांना आर्थिक मदत करावी.
- महाविद्यालयांना आर्थिक मदत करावी.
- प्राथमिक शिक्षण स्थानिक स्वराज्य संस्थेकडे देऊन शासनाने त्यावर लक्ष ठेवावे.
- शासकीय शाळा खाजगी संस्थांना द्याव्यात.
- मुस्लिम शिक्षणाकडे विशेष लक्ष द्यावे.

अशाप्रकारे या शिफारशी आयोगाने सादर केल्या व त्यानुसार शासनाने यातील काही शिफारशी दूर केल्या व काही शिफारशी स्वीकारल्या त्यामुळे प्राथमिक शिक्षणाकडे भावी काळात विशेष लक्ष देण्यात आले.

**निष्कर्ष -**

१) पाश्चिमाचे शिक्षणाची व भौतिक ज्ञान आत्मसात करण्याची संधी मिळाली.

२) समाजातील वरिष्ठ वर्गाचे श्रेष्ठत्व नष्ट झाले.

३) प्रत्येकाला शिक्षणाची संधी मिळाली.

४) ब्रिटिशांना नोकर वर्ग मिळाला.

५) विविध व्यवसाय वाढीस लागले.

६) भारतात राष्ट्रवादाची भावना वाढीस लागली.

**संदर्भ ग्रंथ -**

१) महाराष्ट्रातील समाज सुधारणेचा इतिहास - प्रा. जी एल भिडे/ प्रा. एन डी पाटील, फडके प्रकाशन कोल्हापूर

२) महाराष्ट्रातील समाज सुधारणेचा इतिहास (१८००-१९६०) - डॉ. किशोर कुमार गव्हाणे/ डॉ. एस पी शिंदे, एज्युकेशनल पब्लिशर्स औरंगाबाद

३) महाराष्ट्रातील समाज सुधारक -

प्राचार्य एस एस गाठाळ, कैलास पब्लिकेशन औरंगपुरा औरंगाबाद

४) आधुनिक महाराष्ट्रातील समाज सुधारक - डॉ. रामभाऊ मुटकुळे/ डॉ. नितीन बावळे, चिन्मय प्रकाशन औरंगाबाद

५) आधुनिक भारताचा इतिहास - डॉ. सुमन वैद्य/ डॉ. शांता कौठेकर, श्री साईनाथ प्रकाशन नागपूर

**Publisher's Note:** *The views and opinions expressed in this article are solely those of the author(s) and do not necessarily reflect those of the publisher, editors, or the editorial board.*